असा. क्र. ६६ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, डिसेंबर २९, २००६ / पौष ८, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७.**––महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम . . . . | ४५६–४५८ |

दिनांक २८ डिसेंबर २००६ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग

## सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर '' **महाराष्ट्र शासन राजपत्रात** '' दिनांक २९ डिसेंबर २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १ नोव्हेंबर २००६ रोजी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २००६, हा प्रख्यापित केला होता ;

(१९६४ चा महा. २०. २००६ चा महा. अध्या. १४.)



[**किंमत :** रुपये ९.००]

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :––

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००६ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १ नोव्हेंबर, २००६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश '' मुख्य अधिनियम '' असा करण्यात आला आहे.) याच्या कलम १३ मध्ये,–– १९६४ चा महा. २०.

(क) पोट-कलम (१) मध्ये, खंड (अ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :––

'' (अ) बाजार क्षेत्रात राहणारे (जिल्हाधिकाऱ्याने याबाबतीत वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास एकवीस वर्षांहून कमी वयाचे नसतील असे) खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पंधरा शेतकरी,––

(एक) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्याखाली केलेले नियम यांच्या अर्थांतर्गत असलेल्या, बाजार क्षेत्रात काम करणाऱ्या कृषि पत संस्था आणि बहुउद्देशीय सहकारी संस्था (Multipurpose Co-operative Societies) यांच्या व्यवस्थापन समित्यांच्या सभासदांनी निवडून दिलेले अकरा सदस्य [यांपैकी दोन महिला असतील, एक इतर मागासवर्गाची व्यक्ती असेल आणि एक निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमातीची व्यक्ती असेल] :

परंतु, जर बाजार समिती ही आदिवासी क्षेत्रात असेल तर, निरधिसूचित जमातीच्या (विमुक्त जातीच्या) किंवा भटक्या जमातीच्या व्यक्तीची निवड करण्याऐवजी अनुसूचित जमातीच्या एका व्यक्तीची उपरोक्तप्रमाणे निवड करण्यात येईल ; आणि

(दोन) अशा बाजार समितीच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी निवडून दिलेले चार सदस्य (यांपैकी एक अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातीची व्यक्ती असेल आणि एक आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाची व्यक्ती असेल ) ;'';

(ख) पोट-कलम (१अ) मध्ये, खंड (अ) मधील, उप-खंड (सहा) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :––

'' (सहा) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे पाच प्रतिनिधी [यांपैकी दोन महिला असतील, एक अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातीची व्यक्ती असेल, एक इतर मागासवर्गाची व्यक्ती असेल आणि एक निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमातीची व्यक्ती असेल ] ;'';

(ग) पोट-कलम (१ब) मध्ये, खंड (क) मधील, उप-खंड (सहा) नंतर, पुढील उप-खंड समाविष्ट करण्यात येईल :––

'' (सहा-अ) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे चार प्रतिनिधी [यांपैकी एक महिला असेल, एक अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातीची व्यक्ती असेल,

एक इतर मागासवर्गाची व्यक्ती असेल आणि एक निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमातीची व्यक्ती असेल] :

परंतु, विभागीय किंवा प्रादेशिक बाजार समिती आदिवासी क्षेत्रात असेल तर, राज्य शासन, निरधिसूचित जमातीच्या (विमुक्त जातीच्या) किंवा भटक्या जमातीच्या व्यक्तीच्या जागी अनुसूचित जमातीच्या व्यक्तीस नामनिर्देशित करील ;''.

२००६ चा महा. अध्या. १४.

सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २००६ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशाप्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाद्वारे करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कृती किंवा, यथास्थिती, कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.